**मंत्रालयीन अधिकारी/कर्मचारी यांची डिजिटल सेवापुस्तकाची माहिती फॉर्म्समध्ये ऑनलाईन भरण्यासाठी डेटा एन्ट्री ऑपरेटरची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करणेबाबत...**

# महाराष्ट्र शासन
## आदिवासी विकास विभाग
## शासन निर्णय क्रमांकः आस्था-२०१३/प्र.क्र.१०१/का.१

आदिवासी विकास विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १५.१०.२०१३

**प्रस्तावना -**

राज्य शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे डिजिटल सेवापुस्तक शासनाच्या इन्ट्रानेटरवर अपलोड करावयाचे आहे. विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची जास्त संख्या असल्यास त्यासाठी एका डाटा एन्ट्री ऑपरेटरची ३ महिन्याच्या कालावधीसाठी एनआयसी एसआय या कंपनीने ठरविलेल्या दराने नियुक्ती करायची आहे. त्या अनुषंगाने आदिवासी विकास विभागातील अधिकारी/कर्मचारी यांची डिजिटल सेवा पुस्तक भरण्यासाठी एका डाटा एन्ट्री ऑपरेटरची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यासंदर्भात पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय -**

आदिवासी विकास विभागात मंत्रालयीन स्तरावर कार्यरत असणा-या एकूण ११७ अधिकारी/कर्मचारी यांची डिजिटल सेवापुस्तकाची माहिती विहित फॉर्ममध्ये ऑनलाईन भरण्यासाठी नॅशनल इंफोर्मेटिक्स सेंटर सर्व्हिसेस इंक या कंपनीद्वारे दर करारानुसार नियुक्त करण्यात आलेल्या एका डाटा एन्ट्री ऑपरेटरला रु.१३,६४०/- (अक्षरी रुपये तेरा हजार सहाशे चाळीस मात्र) सर्विस टॅक्स वगळता इतकी रक्कम दरमहा अदा करण्यात येईल.

१) नॅशनल इंफोर्मेटिक्स सेंटर सर्व्हिसेस इंक या कंपनीने "डाटा एंट्री ऑपरेटरची' नियुक्ती तात्काळ करावी. सदर नियुक्ती केवळ ३ महिन्यासाठी असेल.
२) डाटा एन्ट्री ऑपरेटरचे या कालावधीत सर्व ११७ अधिकारी/कर्मचारी यांची माहिती भरणे आवश्यक आहे.
३) या कालावधीत सदर डाटा एन्ट्री ऑपरेटरला शासकीय सुट्टी व्यतिरिक्त अन्य कोणतीही सुट्टी अनुज्ञेय नाही.
४) ज्या डाटा एन्ट्री ऑपरेटरची नियुक्ती करण्यात येईल त्यांच्या अनुपस्थितीत दुस-या डाटा एन्ट्री ऑपरेटरची नियुक्ती त्यांच्या जागी तात्काळ करण्यात यावी.
५) प्रस्तूत नियुक्तीमुळे सदर ऑपरेटरला कोणत्याही शासकीय सेवेत सामावून घेण्याचा हक्क प्राप्त होणार नाही..

प्रस्तूत प्रकरणी येणारा खर्च कार्यालयीन खर्च सन २०१३-१४ साठीच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सदर आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ५५७/व्यय १४,दि.०५.०९.२०१३ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे..

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१०१८१२२०३१०६२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suryawanshi Anil D

Digitally signed by Suryawanshi Anil D
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=MTD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Suryawanshi Anil D
Date: 2013.10.18 12:21:03 +05'30'

(अ. दि. सुर्यवंशी)
उप सचिव

प्रत,

१) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२) सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
३) सहसचिव, सामान्य प्रशासन विभाग/कार्या.१२, मंत्रालय, मुंबई
४) उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५) सर्व उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६) सर्व अवर सचिव/ कक्ष अधिकारी/ कर्मचारी वर्ग, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७) लेखा अधिकारी, (रोख शाखा) यांना कळविण्यात येते की, सदहु आदेशानुसार डिजिटल सेवापुस्तकासंदर्भातील करावयाच्या कार्यवाहीची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.
८) व्यवस्थापन नॅशनल इंफोर्मेटिक्स सेंटर सर्व्हिसेस इंक (द्वारा माहिती व तंत्रज्ञान संचालनालय)
९) अधिदान व लेखाअधिकारी कार्यालय, मुबंई (रोख शाखेमार्फत)
१०) निवड नस्ती, कार्या.१